**नाशिक रन २०२०** • नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजन, लकी ड्रॉ काढत धावपटूंना बक्षीस

# सामाजिक बांधिलकीचा संदेश देत भर थंडीत धावले हजारो नाशिककर

**प्रतिनिधी** | नाशिक

हुडहुडी भरविणारी कडाक्यांची थंडी..., आल्हाददायक वातावरणात ज्येष्ठ नागरिकांसह धावणारी तरुणाई.... विविध संदेशांचे पोस्टर हातात घेत धावणारे चिमुकले.... अशा उत्साहाच्या वातावरणात शनिवारी (दि. ११) सामाजिक बांधिलकीचा संदेश देत हजारो नाशिककर धावले निमित्त होते 'नाशिक रन २०२०'चे.

'नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने यंदाही 'नाशिक रन'चे आयोजन करण्यात आले होते. यंदा रनचे १८वे वर्ष होते. महात्मानगर मैदानापासून ही रन सुरू झाली. तत्पूर्वी सकाळी ६.३० वाजता प्रथमच नाशिक रनमध्ये मॅरेथॉनचेही आयोजन करण्यात आले होते. महात्मानगर ते सोमेश्वर मंदिर आणि पुन्हा महात्मानगर अशा रंगलेल्या १० किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्येही मोठ्या संख्येने नाशिककर सहभागी झाले होते. पुरुष व महिला अशा प्रत्येकी तीन गटात झालेल्या या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या धावपटूंचे नाशिककरांनी टाळ्या अन् शिट्ट्यांनी दाद दिली. या मॅरेथानमध्ये पोलिस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यानंतर नाशिक रन २०२० ला महात्मानगर मैदानावर सुरुवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर महापौर सतीश कुलकर्णी, बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, टीडीके इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालाकृष्णन, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष रमेश जी. आर., सचिव अनिल दैठणकर, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त प्रबल रे, श्री अनंतरामन, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण, मुकुंद भट, पॉवर ट्रेन बॉशचे विभागीय अध्यक्ष जॉन ओलिव्हर, बॉश इंडियाचे सहसंचालक एस. सी. श्रीनिवासन, संदीप नालामंगला, बॉश इंडियाचे बिदाडी प्लांट हेड (टेक्निकल) जार्क बेरंड, बॉश इंडियाचे सहसंचालक कार्स्टन म्यूलर, 'टीडीके'चे अध्यक्ष कल्लोल सहा, टीडीकेचे अध्यक्ष अविनाश देशपांडे, डॉ. वेंकटेश, टीडीकेचे उपाध्यक्ष राजू गाढवे, संजय मोदी, विवेक झंकार आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. घरकुल परिवाराची विशेष विद्यार्थिनी अदिती जाधव हिच्या हस्ते ध्वजारोहण तर आयर्न मॅन स्पर्धेत नाशिकचे नाव उंचाविणारे किशोर घुमरे, महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी आणि डॉ. अरुण गचाले यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली. उद्घाटन सोहळा झाल्यानंतर महात्मानगर मैदान येथून ५ किलोमीटरच्या फन रनला दिव्यांग विद्यार्थ्यांचा गटाच्या रनने सुरुवात झाली. लकी ड्रॉ काढत नाशिक रनमध्ये सहभागी धावपटूंना विविध पारितोषिकांचे वाटप करण्यात आले.





'नाशिक रन'मध्ये ज्येष्ठ नागरिकांनीही सहभाग घेतला.

### संकलित होणाऱ्या निधीच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम

नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गेल्या १९ वर्षांपासून या उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. या रनच्या माध्यमातून संकलित होणाऱ्या निधीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक तसेच क्रीडा क्षेत्रासाठी मदतीचा हात संस्थेच्या वतीने देण्यात येतो.

### हे ठरले मॅरेथॉनचे विजेते

- **३६ ते ५० महिला वयोगट :** प्रथम क्रमांक - अश्विनी देवरे, द्वितीय - नितू सिंग तर तृतीय - नीता नारंग
- **५१ ते ९९ महिला वयोगट :** प्रथम क्रमांक - सुचिता पालवे, द्वितीय - कल्पना कुशारे तर तृतीय - रेवती चिटको
- **१५ ते ३५ पुरुष वयोगट :** प्रथम क्रमांक - रोहित यादव, द्वितीय - सुनीत कुमार तर तृतीय क्रमांक रवी कुमार यांनी पटकावला.
- **३६ ते ५०पुरुष गट वर्षे :** प्रथम क्रमांक सावळीराम शिंदे, द्वितीय संतोष वाघ, तृतीय नंदू उगले यांनी पटकावला
- **५१ ते ९९ वर्षे पुरुष गट** - प्रथम क्रमांक हरिष चंद्र, द्वितीय वसंतराव कचरू तृतीय दिनकर शेळके यांनी पटकावला

### संगीताच्या तालावर थिरकले नाशिककर

नाशिक रन सुरू होण्यापूर्वी महात्मानगर क्रिकेट मैदानावर उद्घाटन सोहळा पार पडला. त्यानंतर संगीताच्या तालावर झुम्बा डान्स, वार्मअप करण्यात आला. यावेळी संगीताच्या तालावर नाशिककरांनी एकच ताल धरला.

### मॅरेथॉनमध्ये सहभागी नागरिकांचा वाढविला उत्साह

नाशिक रनमध्ये यंदा प्रथमच १० किलोमीटरच्या मॅरेथॉनचेही आयोजन करण्यात आले होते. यात ज्येष्ठ नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी होते. कडाक्याच्या थंडीतही सहभागी झालेल्या या ज्येष्ठ नागरिकांचे यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवत उत्स्फूर्त स्वागत केले.

Scanned by CamScanner